# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०९/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन मौदाची कार्यवाही

दिनांक २५/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, एक इसम चिरव्हा कडून मारोडी रोडने चोरीची रेती घेवुन रोडने लाल रंगाच्या ट्रॅक्टर मध्ये वाहतुक करत आहे. अशा माहिती वरून मारोडी मौदा येथे नाकाबंदी केली असता लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र एम एच ४० सी एच ४३१८ व विना क्रमांकाची ट्रॉली हा येताना दिसला ट्रॅक्टर चालकाला नाव विचारले असता त्याने आपले नाव उमेश मोहन निंबार्ते रा चिरव्हा मौदा असे सांगितले त्याला रेती परवाना (रॉयल्टी) विचारले असता रेती परवाना नाही असे सागितले. ट्रॅक्टर मधे अंदाजे ०१ ब्रास रेती किमती ४०००/—रू. भरलेली दिसली. आरोपीकडुन लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र एम एच ४० सी एच ४३१८ किमती ५,००,०००/—रू. व विना क्रमांकाची ट्राली किंमती १,००,०००/—रू. असा एकुण ६,०४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा अनिल कोकोडे यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे आरोपींविरुध्द कलम ३०३(२) बी एन एस ४८(८) महा जमीन महसुल सं सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधि सहकलम ३ संपत्ती नुकसान प्र अधि सहकलम ५०, १७७ महा मो वाहन अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि प्रमोद घोंगे, पोहवा अनिल कोकोडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर